# नाशिक महानगरपालिका, नाशिक

सामान्य प्रशासन विभाग

राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक - 422002

जा.क्र.आस्था/वशि/कार्या-09/45/2026 दिनांक 04/06/2026

## -: प्रसिध्दीपत्रक :-

नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क व गट-ड आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन संवर्गातील 186 रिक्त पदे सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे भरण्यासाठी नामनपा जाहिरात क्र.02/2025, दि.04/11/2025 रोजी दैनिक वृत्तपत्रामध्ये आणि संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती.

उपरोक्त पदभरती जाहीरातीमध्ये नमूद पदाच्या ऑनलाईन परीक्षा दिनांक 24/02/2026 व दिनांक 25/02/2026 रोजी महाराष्ट्र राज्यातील 13 शहरामध्ये टि.सी.एस. आय.ओ.एन यांच्यामार्फत घेण्यात आली होती. सदरील ऑनलाईन परिक्षेत प्राप्त गुणानुक्रमानुसार सामाजिक व समांतर आरक्षण तसेच समान गुण मिळालेल्या उमेदवारांची प्राधान्यवारी क्रमवारी विचारात घेऊन उपरोक्त 2 संवर्गातील एकुण 186 रिक्त पदांसाठी 1:3 याप्रमाणे 673 उमेदवारांच्या निवड सूची व मेरिट लिस्ट नाशिक महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर दि.05/05/2026 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असुन दि.12/05/2026 व दि.13/05/2026 या रोजी 673 उमेदवारांच्या निवड सूचीनुसार कागदपत्रांची छाननी करण्यात आली आहे.

परंतु, शासन निर्णय क्रमांक : प्रानिमं 1222/ प्र.क्र.54/का.13-अ, दि.04 मे 2022 रोजीच्या शासन निर्णयान्वये कर्मचारी निवड समितीच्या निर्णयान्वये गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान 50% व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान 45% गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारांना मैदानी चाचणी करीता पात्र ठरविणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन संवर्गातील एकुण 2389 उमेदवार पात्र होत आहे. एकुण 2389 उमेदवारांपैकी 673 उमेदवारांची छाननी दि.12/05/2026 व दि.13/05/2026 या रोजी पुर्वी झालेली असून उर्वरीत 1716 उमेदवाराची दि.22/05/2026, दि.25/05/2026 व दि.26/05/2026 या रोजी दस्तऐवज पडताळणी कागदपत्रे पडताळणी करण्यात आली आहे.

आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन संवर्गातील 2389 उमेदवारांची कागदपत्रांची छाननी खालील नमुद केलेल्या निकक्षानुसार करण्यात आलेली आहे.

**चालक –यंत्रचालक / वाहनचालक (अग्निशमन) :-**

1) 10 वी पास,
2) वाहनचालक या पदावर किमान 3 वर्षे काम केल्याचा अनुभव
3) वैध जडवाहन चालविण्यासाठी परवाना (31 डिसेंबर 2022 पुर्वीचा)
4) मराठी भाषेचे ज्ञान
5) वयोमर्यादा – खुल्या प्रवर्गासाठी -28 वर्ष व इतर प्रवर्गासाठी – 33 वर्ष
(माजी सैनिकांना वयोमर्यादा सुट)

**अग्निशामक (फायरमन) :-**

1) 10 वी पास,
2) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशामक पाठयक्रम पुर्ण केलेला असावा ("अग्निशामक पाठयक्रम" याचा अर्थ, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी (एमएफएसए), मुंबई किंवा राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांच्याकडील अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण असा आहे किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांच्याकडून मान्यताप्राप्त खाजगी संस्थेकडून सहा महिन्याचा अग्निशमन पाठयक्रम उत्तीर्ण असलेला)
3) मराठी भाषेचे ज्ञान
4) वयोमर्यादा – खुल्या प्रवर्गासाठी -28 वर्ष व इतर प्रवर्गासाठी – 33 वर्ष
(माजी सैनिकांना वयोमर्यादा सुट)

उपरोक्त पात्रता निकष, कागदपत्र पडताळणी व लागू शासन निर्णयांच्या अधीन राहून पात्र व अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तसेच पात्र यादीमध्ये समाविष्ट उमेदवारांच्या मैदानी चाचणीचे वेळापत्रकाबाबत स्वतंत्र प्रसिध्दीपत्रक नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे पात्र उमेदवारांनी वेळोवेळी महानगरपालिकेच्या संकेतस्थळास भेट देऊन अद्ययावत माहितीची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
मनिषा खत्री, भाप्रसे
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक